# <u>मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात</u>

( पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

CNR No.MHBU210005262024

**<u>विशेष दिवाणी दावा क्र.१९/२०२४</u>**

सौ. उषाताई तान्हाजी वाघ

–विरुध्द–

भिकाजी रघुजी ढाकरके व इतर

## <u>अर्ज निशाणी क्र.५ व १८ वरील संयुक्त आदेश</u>

मुळ वादी सौ. उषाताई तान्हाजी वाघ तर्फे अर्ज निशाणी क्र.५ व प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती अशोक नहार (प्रतीदाव्यातील वादी) हिच्यातर्फे प्रतीदाव्यासोबत अर्ज निशाणी क्र.१८ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करण्यात आले आहे. अर्ज निशाणी क्र.५ मधील कथन की, मौजे परतापुर तालुका मेहकर येथील गट क्र.४२ मधील १ हेक्टर ३८ आर जमीन ज्याचा तपशिल चर्तुःसिमेसह वादपत्रातील परिच्छेद क्र.१ मध्ये देण्यात आले आहे. (यापुढे वर नमुद शेतजमीनीस वाद जमीन असे संबोधण्यात येईल.)

२. पुढे अर्ज निशाणी क्र.५ मधील कथन की, वाद जमीन प्रतिवादी क्र.१ च्या मालकीची असुन सदर जमीन त्याने विक्रीस काढली होती आणि सदर जमीन वादी ही खरेदी घेण्याचा सौदा केला. दिनांक २०/०५/२०१३ रोजी दस्त क्र.१५७८/२०१३ अन्वये प्रतिवादी क्र.१ याने वाद जमिनीबाबत वादीच्या हक्कात ताबे इसारपावती लिहुन दिली आणि जमिनीच्या मोबदल्यापैकी १,००,०००/– रुपये वादीकडून स्विकारले. दिनांक २०/०५/२०१३ रोजी पासुन वाद जमीन वादीच्या ताब्यात होती व आहे. सदर ताबे इसार पावती प्रमाणे दिनांक ३१/०७/२०१३ रोजी किंवा त्यापुर्वी खरेदी दस्त करुन घेण्याचे ठरले होते.

३. पुढे अर्ज निशाणी क्र.५ मधील कथन की, वादी ही ताबे इसार पावतीप्रमाणे दिनांक ३१/०७/२०१३ रोजी मोबदल्याची उर्वरित रक्कम प्रतिवादी क्र.१ यास देउन खरेदी दस्त करुन घेण्यास तयार होती. परंतु, प्रतिवादी क्र.१ याने वाद जमिनीचे खरेदी दस्त वादीचे हक्कात करुन दिले नाही आणि तदनंतर खरेदी दस्त

करुन देण्यास टाळाटाळ केली. दिनांक ०५/१२/२०१४ रोजी प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या विधीज्ञामार्फत वादीस नोटीस पाठवुन वाद जमिनीचा ताबा त्यास परत देण्याबाबत कळविले. तदनंतर वर नमुद ताबे इसार पावतीच्या आधारे वाद जमिनीचे खरेदीखत करुन मिळावे म्हणुन वादीने प्रतिवादी क्र.१ विरुध्द दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर मेहकर येथे नियमीत दिवाणी दावा क्र.८४/२०१५ दाखल केला होता. सदर दाव्यास शह देण्यासाठी प्रतिवादी क्र.१ याने वादीविरुध्द वाद जमिनीचा मालकी ताबा जाहिर होउन मिळण्याकरीता नियमीत दिवाणी दावा क्र.५८/२०१८ दाखल केला होता. प्रतिवादी क्र.१ हा वर नमुद दाव्याच्या तारखेस न्यायालयात गैरहजर राहल्याकारणाने तो दावा काढुन टाकण्यात आला.

४. पुढे अर्ज निशाणी क्र.५ मधील कथन की, नियमीत दिवणी दावा क्र.८४/२०१५ न्यायप्रविष्ठ असतांना प्रतिवादी क्र.१ याने मध्यस्थीमार्फत वादीची भेट घेउन झालेल्या ताबे इसार पावतीच्या आधारे वाद जमिनीचे खरेदीदस्त करुन घेण्यास तयार आहे, असे आश्वासन दिले. प्रतिवादी क्र.१ याने मध्यस्थिमार्फत दिलेल्या आश्वासनावर वादीने विश्वास ठेवुन नियमीत दिवणी दावा क्र.८४/२०१५ दिनांक ०७/०७/२०२३ रोजी काढुन घेतला. तदनंतर प्रतिवादी क्र.१ याने दिलेले आश्वासनाप्रमाणे वाद जमिनीचे खरेदीदस्त करुन देण्याची विनंती वादीने केली असता प्रतिवादी क्र.१ हा पुन्हा त्याची पुर्तता करुन देण्यास टाळाटाळ केली. नियमीत दिवणी दावा क्र.८४/२०१५ हा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ याने वादीला अंधारात ठेवुन दिनांक ०३/१२/२०२१ रोजी वाद जमीन बनावट खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र.२ हीस विक्री केली. वास्तविक पाहता ताबे इसार पावतीच्या आधारे वाद जमीन वादीच्या ताब्यात असुन त्या व्यवहाराची पुर्तता प्रतिवादी क्र.१ यांनी न करता बेकायदेशीररित्या वाद जमीन प्रतिवादी क्र.२ हीस विक्री केली आहे.

५. पुढे अर्ज निशाणी क्र.५ मधील कथन की, दिनांक ०३/१२/२०२१

रोजीच्या बनावट खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र.१ व २ हे वाद जमिनीवरील वादीच्या कायदेशीर ताबे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करीत आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ ही सदर खरेदीखताच्या आधारे वाद जमिनीची विल्हेवाट लावण्याच्या तयारीत आहे. तसे झाल्यास दाव्यात पुन्हा गुंतागुंत निर्माण होणार आहे आणि वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी प्रस्तुत दाव्याचा निकाल येईपावेतो प्रतिवादी यांच्या विरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती केली आहे

६. अर्ज निशाणी क्र.५ वर प्रतिवादी क्र.२ हिने तिचे लेखी म्हणणे निशाणी क्र.१२ अनुसार दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास विरोध दर्शविला आहे.

७. प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती अशोक नहार (प्रतिदाव्यातील वादी) हिने निशाणी क्र.१४ अनुसार दाखल केलेल्या प्रतिदाव्यातील अर्ज निशाणी क्र.१८ मधील कथन की, दिनांक २०/०५/२०१३ रोजीच्या बनावट ताबे इसार पावतीच्या आधारे वादीने प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके यांच्या विरुध्द नियमीत दिवाणी दावा क्र.८४/२०१५ दाखल केला होता. तदनंतर वादी उषाताई तान्हाजी वाघ व प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके यांच्यात तडजोड झाली आणि त्या तडजोडीच्या आधारे प्रतिवादी क्र.१ याने वादीकडून घेतलेली इसार रक्कम रुपये १,००,०००/– व नुकसानी म्हणुन असे एकुण ३,००,०००/– रुपये आर.टी.जी.एस. द्वारे तिच्या खात्यात जमा केली. सदर तडजोडीअनुसार वादीने दिनांक २०/०५/२०१३ रोजीच्या ताबे इसारपावतीच्या आधारे प्राप्त झालेले सर्व अधिकार सोडून दिले आणि वर नमुद दावा काढुन घेतला. वर नमुद दाव्यात वरिलप्रमाणे तडजोड झाल्यानंतर वाद जमिनीशी वादीचा कोणताही हितसंबंध राहिलेला नव्हता व नाही.

८. पुढे अर्ज निशाणी क्र.१८ मधील कथन की, दिनांक ०२/१२/२०२१ रोजीच्या दस्त क्र.५४६३/२१ अन्वये वाद जमीन प्रतिवादी

क्र.१ सौ. ज्योती अशोक नहार हिने रुपये १४,७०,०००/– च्या मोबदल्यात प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके यांच्याकडून खरेदी घेतली. सदर खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र.२ सौ. सौ. ज्योती अशोक नहार ह्या मालक व ताबेदार झाल्या आहेत. वास्तविक पाहता वाद जमिनीशी वादी उषाताई तान्हाजी वाघ हिचा कोणताही संबंध राहीलेला नसतांना तिला प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त नाही. पुढे असे कथन केले की, प्रतिवादींना त्रास देण्याच्या हेतुने तसेच त्यांच्याकडून बेकायदेशीर रित्या रक्कम उकळण्याच्या हेतुने वादीने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. वाद जमिनीवर प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती अशोक नहार हिचा मालकी ताबा असतांना वादी ही बेकायदेशीररित्या वाद जमिनीवरील ताबे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करीत आहे. तरी प्रतीदाव्याचा निकाल येईपावेतो वादी उषाताई तान्हाजी वाघ हिच्या विरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

९. अर्ज निशाणी क्र.१८ वर मुळ वादी उषाताई तान्हाजी वाघ (प्रतीदाव्यातील प्रतिवादी) हिने तिचे लेखी म्हणणे निशाणी क्र.२२ अनुसार दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास विरोध दर्शविला आहे.

१०. अर्ज निशाणी क्र.५ बाबत उभयपक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुळ दाव्यातील मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्ज निशाणी क्र.५ संदर्भात मुळ वादी उषाताई तान्हाजी वाघ हिने प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ... नकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल मुळ वादी उषाताई तान्हाजी वाघ हिच्या बाजूने आहे काय ? | ... नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास मुळ वादी उषाताई तान्हाजी वाघ हिचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | ... नकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज निशाणी क्र.५ नामंजूर करण्यात आला. |

११. अर्ज निशाणी क्र.१८ बाबत उभयपक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रतिदाव्यातील मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्ज निशाणी क्र.१८ संदर्भात वादी सौ. ज्योती अशोक नहार (मुळ दाव्यातील प्रतिवादी) हिने प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ... होकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादी सौ. ज्योती अशोक नहार हिच्या बाजूने आहे काय ? | ... होकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादी सौ. ज्योती अशोक नहार हिचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय? | ... होकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज निशाणी क्र.१८ मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

१२. उभयपक्षांनी आपआपल्या लेखी कथनाच्या पुष्ट्यर्थ स्वतःचे शपथपत्र व वाद जमिनीशी संबंधीत असलेले कागदपत्र दाखल केले आहेत.

१३. उभयपक्षांच्या विधीज्ञांचा युक्तवाद ऐकण्यात आला.

**अर्ज निशाणी क्र.५ व अर्ज निशाणी क्र.१८ मधील मुद्दे क्र.१ ते ४ करीताः**–

१४. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत करण्यात येत आहे. उभयपक्षांच्या लेखी कथनावरुन असे दिसुन येते की, वाद जमीन

प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके यांच्या मालकीची असुन दिनांक २०/०५/२०१३ रोजी दस्त क्र.१५७८/२०१३ नुसार वाद जमिनीची ताबे इसारपावती वादीच्या हक्कात करुन दिला होता. सदर ताबे पावतीत वाद जमिनीचा ताबा वादीस दिनांक २०/०५/२०१३ रोजी देण्यात आला आहे असा उल्लेख आहे. पुढे असे दिसुन येते की, वादी उषाताई वाघ हिने दिनांक २०/०५/२०१३ रोजीच्या ताबे इसार पावतीच्या आधारे खरेदी दस्त होउन मिळण्याकरीता प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके याच्या विरुध्द नियमीत दिवाणी दावा क्र.८४/२०१५ दाखल केला होता. सदरचा दावा वादी हिने दिनांक ०७/०७/२०२३ रोजी काढुन घेतला आहे. पुढे असेही दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके यांनी प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार हिच्या हक्कात दिनांक ०३/१२/२०२१ रोजी दस्त क्र.५४६३/२०२१ अन्वये वाद जमिनीचे खरेदीदस्त करुन दिले आहे.

१५. प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार (प्रतिदाव्यातील वादी) हिने तिच्या कथनाच्या पुष्ट्यर्थ नियमीत दिवाणी दावा क्र.८४/२०१५ मधील निशाणी क्र.१ अनुसार दाखल वादपत्र व त्यावरील दिनांक ०७/०७/२०२३ रोजी पारित झालेल्या आदेशाची प्रत दाखल केली आहे. दिनांक ०७/०७/२०२३ रोजी पारित झालेल्या आदेशाचे अवलोकन केले असता निशाणी क्र.२१ तडजोड पुरसिसच्या आधारे वर नमुद दावा वादीने उषाताई वाघ हिने काढुन घेतले असल्याकारणाने निकाली काढण्यात आला आहे असे नमुद आहे. तडजोड पुरसिस निशाणी क्र.२१ ची प्रत दाखल करण्यात आली आहे. सदर तडजोड पुरसिसचे अवलोक केले असता वादी उषाताई वाघ हिने प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके यांच्याशी तडजोड करुन इसार रक्कम रुपये १,००,०००/– व नुकसानी म्हणुन रुपये २,००,०००/– असे एकुण रुपये ३,००,०००/– आर.टी.जी.एस. द्वारे स्विकारल्याचा उल्लेख आहे. पुढे सदर तडजोडपत्रात वादी उषाताई वाघ हिच्या हक्कात दिनांक २०/०५/२०१३ रोजी प्रतिवादी क्र.१ याने करुन दिलेल्या ताबे इसार पावतीच्या आधारे असलेले सर्व

हक्क अधिकार सोडून दिल्याचा देखील उल्लेख आहे. वर नमुद तडजोड पुरसिस वरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी उषाताई वाघ हिने वाद जमिनीबाबत दिनांक २०/०५/२०१३ रोजी झालेल्या ताबे इसार पावती संदर्भात सर्व कायदेशीर हक्क सोडून देउन त्यापोटी इसार रक्कम व नुकसान भरपाई प्रतिवादी क्र.१ कडून स्विकारलेली आहे. सदर पुरसिसच्या आधारे नियमीत दिवाणी दावा क्र.८४/२०१५ कायमस्वरुपी निकाली काढण्यात आला आहे. पुढे प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, दिनांक ०७/०७/२०२३ पासुन वाद जमिनीशी वादी उषाताई वाघ हिचा कोणताही हक्क संबंध व ताबा राहिलेला नाही. वादी उषाताई वाघ हिने वरिल हकीकत तिच्या वादपत्रात नमुद केलेली नाही. निश्चितच वादीने वरील हकीकत न्यायालयापासुन लपवण्याचा प्रयत्न केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

१६. प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार (प्रतिदाव्यातील वादी) हिने तिच्या कथनाच्या पुष्ट्यर्थ दिनांक ०२/१२/२०२१ रोजी झालेल्या खरेदी दस्ताची प्रत दाखल केली आहे. सदर खरेदी दस्तावरुन प्रथम दर्शनी असे दिसुन येते की, वाद जमीन प्रतिवादी क्र.१ भिकाजी ढाकरके याने प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार यांना नोंदणीकृत खरेदीदस्ताने विक्री केली आहे. पुढे असेही दिसुन येते की, सदर खरेदी दस्ताच्या आधारे प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार हिच्या नावे फेरफार क्र.७१७ मंजुर होउन जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर नोंद झाली आहे. वर नमुद कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वाद जमीन प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार हिच्या मालकी ताबे वहिवाटीत आहे. सबब, प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार हिने अर्ज निशाणी क्र.१८ संदर्भात प्रथमदर्शनी पुरावा न्यायालयात सादर केला आहे. न्यायालयासमोर दाखल कागदपत्रावरुन न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार (प्रतिदाव्यातील वादी) हिच्या बाजुने असल्याचे दिसुन येत आहे. वाद जमिनीशी वादी उषाताई वाघ हिचा कोणताही हितसंबंध नसल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे अर्ज निशाणी क्र.५ नामंजुर झाल्याचे तिचे कोणतेही नुकसान

होणार नाही. याउलट प्रतिवादी क्र.२ सौ. ज्योती नहार हिच्या लेखी कथनावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी उषाताई वाघ ही वाद जमिनीवरील सौ. ज्योती नहारच्या ताबे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करीत आहे आणि भविष्यात देखील तसे कृत्य करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्याकरीता उषाताई वाघ हिच्याविरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारित करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, अर्ज निशाणी क्र.५ मंजुर होण्यास पात्र नाही. प्रतिदाव्यातील वादी सौ. ज्योती नहार हिच्या मागणी अनुसार अर्ज निशाणी क्र.१८ मंजुर होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मी अर्ज निशाणी क्र.५ मधील मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी आणि अर्ज निशाणी क्र.१८ मधील मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र.५ नामंजूर करण्यात आला.

२. अर्ज निशाणी क्र.१८ मंजूर करण्यात आला.

३. प्रतिदाव्यातील प्रतिवादी सौ. उषाताई तान्हाजी वाघ ही स्वतः किंवा इतरांमार्फत वाद जमिनीवरील प्रतिदाव्यातील वादी सौ. ज्योती अशोक नहार हिच्या मालकी ताबे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा निर्माण करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात येत आहे.

४. खर्चाबाबत हुकूम नाही.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.03.20 15:00:25 +0530

**(अ. अ. शेख)**

दिनांकः २०/०३/२०२५

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मेहकर.

विशेष दिवाणी दावा क्र.१९/२०२४
उषाताई वाघ -वि.- भिकाजी ढाकरके व इतर

**प्रमाणपत्र**

| | |
|---|---|
| मी असे प्रमाणीत करतो की, या P.D.F. आदेश फाईलमधील मजकुर मुळ आदेशाच्या फाईलप्रमाणेच शब्दशः सारखा आहे. | |
| लघुलेखक ग्रेड २ यांचे नाव | बाळकृष्ण म. शीलवंत. |
| न्यायालयाचे नाव | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मेहकर. |
| आदेश घोषीत दिनांक | २०/०३/२०२५ |
| पिठासीन अधिकारी यांनी आदेश स्वाक्षरी केल्याचा दिनांक | २०/०३/२०२५ |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | २१/०३/२०२५ |